Knowledgeable Research (KR) 2026, Special Vol., (5):02
ISSN: 2583-6633, CODEN: KRABAU
International open-access peer-reviewed refereed monthly journal
https://knowledgeableresearch.com/index.php/1

# मराठी साहित्य आणि एआय (AI): परंपरा, परिवर्तन आणि भविष्य

डॉ निलेश एकनाथराव लोंढे*

मराठी विभाग, ज्ञानोपासक महाविद्यालय परभणी

**शोध सार**

*मराठी साहित्याला संत साहित्यापासून आधुनिक कादंबरी, कविता, नाटक आणि ललित लेखनापर्यंत दीर्घ आणि समृद्ध परंपरा आहे. या परंपरेत आता कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हा नवा घटक सामील होत आहे. हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर सर्जनशीलतेच्या स्वरूपालाही स्पर्श करणारा आहे. एआय म्हणजे संगणक प्रणालींना मानवी विचारसरणीसारखी क्षमता देणे, यामुळे यंत्राच्या मदतीने भाषा समजणे, लिहिणे, विश्लेषण करणे, भाषांतर करणे, शैली, छंद, आशयाचे विश्लेषण करणे, या सर्व कार्यांचा समावेश होतो. यामुळे मराठी साहित्याला काही फायदे होऊ शकतात. उदा. कथानक रचना, संवाद, शब्दसंपदा सुचवणे, प्रूफरीडिंग, व्याकरण, शैली सुधारणा तसेच भाषांतर करून मराठी साहित्य जागतिक वाचकांपर्यंत पोहोचवणे शक्य होणार आहे. संशोधनाच्या क्षेत्रात जुने ग्रंथ, हस्तलिखितांचे डिजिटायझेशन व विश्लेषण यामुळे सहज सुलभ होऊ शकते. परंतु या फायद्यासोबत एआयचा वापर करताना काही आव्हाने आणि प्रश्न निर्माण होऊ शकतात. उदा. एआय-निर्मित मजकूर आणि लेखकाची स्वतःची सर्जनशीलता संकटात सापडू शकते. तसेच कलाकृतीमधील बोली, सांस्कृतिक संदर्भ, भावनिक खोली, भाषिक सूक्ष्मता नष्ट होऊ शकते. तसेच कॉपीराइट संदर्भात काही प्रश्न निर्माण होऊ शकतात. अनेक अभ्यासक एआयला सहलेखक किंवा साधन म्हणून वापरणे अधिक योग्य ठरेल, असे मत मांडतात. कारण कल्पना, अनुभव, संवेदना या मानवी असतात; एआय त्यांना निर्माण करण्यासाठी इतर संदर्भांची मदत करू शकते.*

*भविष्यात शाळा, महाविद्यालयांत मराठीसाठी भाषा आणि साहित्य शिक्षण हे एआय-आधारित शिक्षण होऊ शकते. तसेच ग्रामीण–शहरी बोलींचे जतन व अभ्यास करण्यासाठी एआयचा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे अभ्यासक, एआय ही मराठी साहित्याची जागा घेणारी शक्ती नसून, ती साहित्याला नवे परिमाण देणारी साधनसामग्री आहे, असे मानतात. परंपरेचा सन्मान राखत, विवेकाने आणि सर्जनशीलतेने एआयचा वापर केल्यास मराठी साहित्याचे भविष्य अधिक समृद्ध होऊ शकते. यावर अनेकांना विश्वास आहे.*

**बीज शब्द:** *मराठी साहित्य, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), परंपरा, परिवर्तन, भविष्य, सर्जनशीलता, सहलेखन, शोध, भाषांतर, तंत्रज्ञान*

**Received: 02/12/2025**
**Accepted: 17/01/2026**
**Published: 31/01/2026**

***Corresponding Author:**
डॉ निलेश एकनाथराव लोंढे
**Email:** nileshelondhe@gmail.com

**स्वरूप**

संगणक अल्गोरिदमवर चालतो. अल्गोरिदम म्हणजे स्पष्ट नियम, पायऱ्या आणि तर्कशुद्ध रचना. एआयमुळे अल्गोरिदम साहित्य क्षेत्रात मिसळत आहेत. अल्गोरिदमच्या साह्याने आपण कथालेखन काव्य लेखन करू शकतो.

एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ठरावीक क्रमाने केलेल्या पायऱ्यांचा संच म्हणजे अल्गोरिदम. कथालेखनात याचा अर्थ, कथानक कसे पुढे जाईल याचे नियम निश्चित करताना होऊ शकतो. तसेच पात्रांचे वर्तन कसे बदलेल याची तर्करचना करताना होऊ शकतो. वाचकाच्या प्रतिसादानुसार कथा कशी वळवावी, यासाठी देखील अल्गोरिदम मदत करू शकेल. एआय अल्गोरिदम जेव्हा मानवी लेखकाची मदत करेल तेव्हा तो कथानकाचे पर्याय सुचवेल, गती, ताण (pacing), पुनरुक्ती तपासेल. तर मानवी लेखक हा भावनिक खोली देईल आणि सांस्कृतिक संदर्भ, अनुभव, मूल्ये जोडेल. या ठिकाणी अल्गोरिदम "कसे सांगायचे" यात मदत करेल तर लेखक "का सांगायचे" हे

ठरवेल. या ठिकाणी कथा साच्यात अडकण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. पण या ठिकाणी एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, अल्गोरिदम कथालेखनाचा पर्याय नाही, तर साधन आहे. तर्क आणि कल्पना एकत्र आल्यावर नवे साहित्यप्रकार जन्माला येऊ शकतात, जिथे लेखक हा "डिझायनर" आणि कथा ही "जिवंत प्रणाली" होते. डिजिटल ह्युमॅनिटीज निर्माण होऊ शकते.

डिजिटल ह्युमॅनिटीज (Digital Humanities) म्हणजे मानवविद्यांच्या (साहित्य, इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र) अभ्यासात डिजिटल साधने, संगणकीय पद्धती आणि डेटाविश्लेषणाचा वापर करणे होय. मराठी साहित्याच्या अभ्यासाला यामुळे नवी दृष्टी, वेग आणि विस्तार मिळू शकतो. एआयमुळे जुने ग्रंथ, हस्तलिखिते, नियतकालिके स्कॅन करणे, त्यांचे डिजिटायझेशन आणि जतन करणे सहज शक्य होऊ शकते. तसेच OCR (Optical Character Recognition) द्वारे मजकूर शोधन सर्वांसाठी उपलब्ध करणे शक्य आहे. संगणकाच्या सहाय्याने साहित्यविश्लेषण करताना शब्दवारंवारता, शैली (style) यांचे विश्लेषण करणे, कवी/लेखकांची भाषिक वैशिष्ट्ये ओळखणे, कालानुसार विषय, प्रतिमा, भावभावनाच्या बदलांचा तुलनात्मक अभ्यास करणे संगणकामुळे सहज शक्य होऊ शकते.

ए आईकडे साठवण क्षमता प्रचंड असल्यामुळे कॉर्पस आणि डेटाबेस निर्मिती केली जावू शकते. उदा. मराठी कादंबरी, कविता, नाटकांचा संग्रह करणे. बोलीभाषा, लोकसाहित्य यांचे स्वतंत्र कॉर्पस तयार करणे. संशोधनासाठी खुले (open) डेटासेट्स निर्माण करणे सहज शक्य आहे.

पुस्तके छापण्याऐवजी डिजिटल एडिशन्स निर्माण करून टीका, संदर्भ, शब्दार्थांसह ऑनलाइन ग्रंथ निर्माण होऊ शकतात. संत साहित्य, बखरी, शाहिरी साहित्य यांची ई आवृत्ती निर्माण करता येऊ शकते. हे तंत्रज्ञानामुळे साहित्याची निर्मिती त्याचे संरक्षण आणि प्रचार प्रसार फार मोठ्या प्रमाणात होऊ शकतो परंतु या प्रक्रियेमध्ये लेखकाचे स्वामित्व हक्क किंवा कॉपीराईट यासंबंधीचे फार गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतात. कॉपीराइट म्हणजे मूळ, सर्जनशील अभिव्यक्तीला कायदेशीर संरक्षण होतं. लेखकाला प्रकाशन, पुनर्मुद्रण, अनुवाद, रूपांतर यांचे हक्क मिळविण्यासाठी निर्माण झालेले हे कायदे आहेत. भारतात Copyright Act, 1957 लागू आहे. यामध्ये एआय संबंधित नियम नाहीत त्यामुळे, एआयने लिहिलेल्या साहित्याचा लेखक कोण? असा प्रश्न निर्माण होऊ शकतो कारण एआय स्वतः कायदेशीर लेखक मानला जात नाही. एआय वापरणारा/निर्देश देणारा व्यक्ती किंवा प्रकाशक/संस्था हा लेखक मानला जातो. याशिवाय आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे ए आहे हा लहान मुलाप्रमाणे स्वतः काही गोष्टी शिकत असतो, त्याला प्रशिक्षण देण्यासाठी काही साहित्याची आवश्यकता असते. एआय प्रशिक्षणासाठी वापरलेले साहित्य आणि त्याचे कॉपीरेट्स याविषयी देखील काही प्रश्न आज निर्माण झालेले आहेत.

एआय मॉडेल्सना शिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणात मजकूर वापरला जातो. हे साहित्य कॉपीराइटखाली असल्यास परवानगी लागते का? भारतात याबाबत स्पष्ट कायदे नाहीत. अशा परिस्थितीत शैलीची नक्कल आणि साहित्यचोरी होऊ शकते. शब्दशः नक्कल नाही, पण शैलीची हुबेहूब नक्कल केली तर त्याला साहित्य चोरी म्हटले जात नाही. कारण शैलीवर कॉपीराइट नसतो, पण यातून सर्जनशीलतेच्या नैतिकतेचा प्रश्न निर्माण होतो. एआयमुळे लेखक, प्रकाशक आणि संशोधकांसाठी काही अडचणी निर्माण होऊ शकतात. उदा. अनधिकृत पुनर्लेखन /किंवा पुनर्प्रकाशन होऊ शकते. एआयद्वारे मोठ्या प्रमाणावर साहित्यनिर्मिती झाल्यास मूळ लेखकाला श्रेय मिळणार नाही. मुळात लेखकाची निर्मिती कोणती आणि या निर्मिती कोणती हे लक्षात येणार आहे यासाठी एआय-निर्मित साहित्याचे स्पष्ट लेबलिंग करणे गरजेचे आहे असे काही अभ्यासकांना वाटते. तसेच लेखकानी स्वतःच्या साहित्याचे नोंदणीकरण करणे आवश्यक आहे. प्रकाशन करारात एआय-वापर स्पष्ट करणे देखील उपयुक्त ठरू शकते. मुळात एआयला साधन म्हणून वापरणे योग्य ठरेल.

एआय सर्जनशीलतेचा विस्तार करतो, पण स्वामित्व हक्कांचा पाया मानवकेंद्रीच राहिला पाहिजे.

कायदा, तंत्रज्ञान आणि साहित्य यांच्यातील संवाद वाढल्याशिवाय हे संतुलन साधता येणार नाही. एआयमुळे लेखन वेगवान व सुलभ झाले असले, तरी साहित्यिक चोरी या जुन्याच समस्येला नवी, गुंतागुंतीची रूपे निर्माण होऊ शकतात. विशेषतः शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात याबाबत स्पष्ट कायदे अत्यावश्यक आहेत. कारण इतरांच्या सर्जनशील कामाचा, कल्पना, रचना, शैली यांचे योग्य श्रेय न देता वापर करणे म्हणजे साहित्यिक चोरी होऊ शकते. एआय सामान्यतः सांख्यिक नमुन्यांवर आधारित मजकूर निर्माण करतो. त्यामध्ये थेट कॉपी करण्याचा हेतू नसतो. परंतु कधी कधी अतिसाम्य (overlap) निर्माण होऊ शकतो. ही जबाबदारी वापरकर्त्याची आहे एआय ची नाही. कारण एआयने लिहिलं म्हणून जबाबदारी टाळता येत नाही.

त्यामुळे शैक्षणिक/प्रकाशन क्षेत्रात याच्या मदतीने चोरी करणारा किंवा नक्कल करणारे सादर करणारा व्यक्तीच जबाबदार मानला जाऊ शकतो कारण एआय एक साधन आहे लेखक नाही. त्यामुळे साहित्यिक चोरी किंवा अनुकरण जस्ट केल्या जाऊ शकते तसेच ते शोधणे सहज शक्य होऊ शकते वेगवेगळ्या सॉफ्टवेअर च्या मदतीने Plagiarism detection करणे सहज शक्य आहे. याद्वारे समान वाक्यरचना आणि शब्दक्रम तपासणी करता येऊ शकते. त्यामुळे मौलिकता, पारदर्शकता आणि जबाबदारी या मूल्यांवर आधारित वापर केल्यास एआय साहित्यनिर्मितीचा उपयुक्त सहकारी ठरू शकतो, असे म्हणता येते.

**फायदे :** संगणकीकरण आणि तंत्रज्ञान यामुळे अभ्यासकांनी खालील फायदे होऊ शकतात, अशी मांडणी केलेली आहे.

1. ईबुक्स, ऑडिओबुक्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्समुळे मराठी साहित्य आता जगभरातील वाचक मराठी साहित्य सहज वाचू शकतात. तंत्रज्ञानामुळे नवोदित लेखकांना प्रसिद्धी मिळवणे सोपे झाले आहे.

2. पर्यावरणपूरक आणि खर्चविरहित डिजिटल साहित्यामुळे कागदाचा वापर कमी होतो, वितरण खर्चही वाचतो.

3. शिकण्याची गती वाढते AI आधारित ॲप्समुळे व्याकरण, उच्चार आणि वाचन कौशल्य सुधारता येते.

4. मराठी साहित्याचे शिक्षण आता ई लर्निंग, व्हिडिओ लेक्चर्स, डिजिटल नोट्स यांद्वारे दिले जाते.

5. नवोदित लेखकांना मार्गदर्शन मिळते आणि विविध भाषांमधील साहित्य सहज उपलब्ध होईल

तोटे : संगणकीकरण आणि या तंत्रज्ञानामुळे साहित्य क्षेत्रात खालील तोटे किंवा नुकसान होऊ शकतात, अशी मांडणी अभ्यासकांनी केलेली दिसून येते.

1. कॉपीराइट आणि पायरसी डिजिटल स्वरूपात साहित्य सहज कॉपी करता येते, त्यामुळे लेखकांचे हक्क धोक्यात येतात.

2. सर्वच डिजिटल साहित्य दर्जेदार नसते. कोणीही साहित्य प्रकाशित करू शकते, त्यामुळे दर्जा राखणे कठीण होते. कॉपीपेस्टमुळे सर्जनशीलतेचा अभाव.

3. मोबाइल, सोशल मीडिया आणि सततच्या नोटिफिकेशन्समुळे वाचनात व्यत्यय येऊन वाचनाची एकाग्रता कमी होते.

4. ज्येष्ठ वाचक अजूनही पारंपरिक पुस्तकांना प्राधान्य देतात, त्यामुळे डिजिटल साहित्य त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात अडचणी येतात.

5. सर्जनशीलतेवर प्रश्न, साहित्यिक बेरोजगारीचा धोका आणि साहित्याच्या नैतिकतेवर परिणाम होऊ शकतो.

**सारांश:**

कृत्रिम बुद्धिमत्ता हा मानवी बुद्धिमत्तेने निर्माण केलेला चमत्कार आहे ! या तंत्रज्ञानामुळे अनेक अद्भुत गोष्टी साध्य होऊ शकतात !! या तंत्रज्ञानाच्या विकासाचा वेग विलक्षण आहे. येत्या काळात ते आपल्याही कळत-नकळत आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनणार आहे. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असते, आणि तंत्रज्ञान हे त्या आरशाला अधिक स्पष्ट बनवते. आधुनिक तंत्रज्ञान हे आजच्या साहित्याच्या प्रसाराचे प्रभावी माध्यम बनले आहे. आज ईपुस्तके, ऑडिओबुक्स, ब्लॉग्स, पॉडकास्ट्स आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून मराठी साहित्य अधिक व्यापक प्रमाणात वाचकांपर्यंत पोहोचत आहे. लेखक आणि कवी आता डिजिटल प्लॅटफॉर्मवरून थेट वाचकांशी संवाद साधू शकतात. साहित्य संमेलने, चर्चासत्रे आणि कार्यशाळा ऑनलाइन होत आहेत, ज्यामुळे ग्रामीण भागातील साहित्यप्रेमींनाही सहभाग घेता येतो. या सगळ्या बदलांमुळे साहित्याची अभिव्यक्ती अधिक सर्जनशील, संवादात्मक आणि समावेशक झाली आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ. गिरीश वालावलकर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मायमिरर पब्लिशिंग हाउस प्रा. लिमिटेड (10 ऑगस्ट 2024)

2. कविता भालेराव, तंत्रज्ञानाची मुळाक्षरे, भाग १, मेहता पब्लिशिंग हाऊस, 2007

3. मराठी विश्वकोश ऑनलाईन, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.

4. डॉ. नंदकुमार मोरे, मराठी भाषा माहिती आणि तंत्रज्ञान, यशवंतराव चव्हण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. मे २०२३

5. विलास गायकवाड, मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान, AKSHARASURYA, E-Journal.

6. विनोद जैतमल, समाज माध्यमांतील लेखनकौशल्ये सोशल मीडियावरील बदलते लेखनविश्व साकेत प्रकाशन, छ. संभाजीनगर, प्र. आ. २०२४

Copyright: © The authors. This article is open access and licensed under the terms of the Creative Commons Attribution License (http://creativecommons.org/licenses/by/4.0/)